# युकेआयबीसी आणि लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये वर्तनप्रशिक्षण सुरू करण्यासाठी सामंजस्य करार

**मुंबई, जानेवारी 16, 2014** ः युके इंडिया बिझनेस कौन्सिल (भारत) आणि हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन कंपनीची (एचसीसी) एक उपकंपनी असलेल्या द लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड (एलसीएल) यांच्यात मॅथ्यू हॅनकॉक, युकेचे कौशल्य आणि उद्योजकता खात्याचे राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातील नियोजित शहर असलेल्या लवासामध्ये वर्तनप्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यासाठी सामंजस्य करारावर आज स्वाक्षर्या करण्यात आल्या.

बांधकाम आणि सुरक्षा व्यवसायातील कर्मचार्यांना अधिक कुशल बनवणे आणि त्यांना कामाच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध करून देणे, हे या सामंजस्य कराराचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून, विविध कौशल्यांमध्ये पारंगत असलेल्या तज्ज्ञ मार्गदर्शकांना एकत्र आणून युकेआयबीसी मध्यस्थाची भूमिका पार पाडणार आहे. हा तज्ज्ञांचा गट एलसीएलमधील कर्मचारी आणि स्थानिक समाजघटकांच्या कौशल्यांना पैलू पाडण्यासाठी एलसीएलसोबत काम करणार आहे.

भारतातील कौशल्य आणि शिक्षण क्षेत्र सध्या एका परिवर्तनाच्या स्थितीतून जात आहे. भारतातील तरुणांची लोकसंख्या आणि वेगाने वाढणार्या अर्थव्यवस्था पाहता देशाला त्याच वेगाने वाढणार्या महत्वाकांक्षी मनुष्यबळाची कौशल्ये वाढवण्यावर भर देणे आवश्यक आहे. 2020 पर्यंत 11,000 नवीन शाळा उभारून त्यात चार कोटी पदवीधर निर्माण करणे, हे या प्रकल्पांच्या उद्दिष्टांपैकी एक आहे. भारतातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना जोड देणारे ही कौशल्य पुरवणारी केंद्रे म्हणजे इंग्लंडमधील जागतिक दर्जाच्या कौशल्य प्रशिक्षकांसाठी एक मोठी संधी आहे.

विविध कौशल्य प्रशिक्षणांमध्ये इंग्लंडमधील शिक्षणसंस्थांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यावसायिक मानदंड प्रस्थापित केले आहेत आणि भारतातील हे उद्दिष्ट, इंग्लंडमधील कौशल्य पुरवठादारांसाठी भारतात अनेक संधी उपलब्ध करून देणार आहेत. पात्रता आणि मानदंड यांत सिटी ऍण्ड गिल्ड्स, एडेक्स्लो आणि स्कॉटिश क्वॉलिफिकेशन ऑथॉरिटी यासारख्या संस्था भारतीय बाजारपेठेत यापूर्वीच कार्यरत आहेत.

मा. पॅट्रिशिया ह्युइट, अध्यक्ष, युकेआयबीसी, या सामंजस्य कराराबद्दल बोलताना म्हणाले, `फक्त लवासामधील कर्मचारीच नव्हे, तर लवासामधील विविध समाजघटकांना प्रशिक्षण देण्यासाठी उपयुक्त ठरणार्या या करारावर युकेआयबीसी आणि लवासा कॉर्पोरेशनने स्वाक्षर्या केल्याचा मला आनंद आहे. मला विश्वास आहे की, भारतीय व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रशिक्षण समजून घेत, युकेतर्फे नाविन्यपूर्ण कौशल्य आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन इथे लाभेल. युके आणि भारतातील प्रशिक्षण संस्थांमधील भागीदारी वाढत असली ती या क्षेत्रात आणखी बराच वाव आहे.'

युकेआयबीसीबरोबरच्या या सामंजस्य कराराबद्दल बोलताना नॅथन अँड्रयूस, अध्यक्ष, लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणाले, `पाहुणचार, शिक्षण, प्रवास आणि मौजमजेची साधनं पुरवणार्या सध्या असलेल्या अनेक उद्योगांसोबतच आणखी नव्या उद्योगांचं लवासामध्ये स्वागतच आहे. येथील मनुष्यबळाला प्रशिक्षित करण्यासाठीच्या

युकेआयबीसीसोबतच्या या करारामुळे, या थंड हवेच्या शहरात येऊ पाहणार्या व्यवसायांना प्रशिक्षित आणि हुशार कर्मचार्यांसोबत काम करण्यात मदतच होणार आहे. लवासामध्ये सध्या काम करत असलेल्या स्थानिकांनाही या प्रशिक्षणामुळे त्यांच्यातील कौशल्य वाढवण्याची आणि त्याद्वारे अधिक चांगल्या कामाच्या संधी शोधण्यात मदत होणार आहे.'

**लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड (एलसीएल)बद्दल :** लवासा हे भारतातील पहिले नियोजित थंड हवेचे ठिकाण आहे जिथे नागरिक निसर्गाच्या सानिध्यात राहू शकतात, काम करू शकतात, शिकू शकतात आणि खेळू शकतात. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे (एलसीएल) विकसित करण्यात आलेले हे एक खास शहर आहे. 10,000 हेक्टर्सवर वसलेले हे शहर आधुनिक शहरीकरणाच्या तत्वावर आधारलेले आहे. मुंबईहून तीन तासांच्या तर पुण्याहून तासाभराच्या रस्त्याच्या प्रवासाने लवासाला पोहोचता येते. भविष्यात पाहुणचार, पर्यटन, शिक्षण, आरोग्य, व्यावसायिक संशोधन आणि कारखाने यासारख्या क्षेत्रात लवासातर्फे जागतिक नेत्यांची एक फळीच उभारली जाणार आहे. या थंड हवेच्या ठिकाणी भाडेतत्वावरील घरे, अपार्टमेंट आणि विलाजच्या रूपात काही पारंपरिक आणि कालातीत वालस्तूशात्राचे नमूने पहायला मिळतात. अतिशय उच्च दर्जाच्या सोयीसुविधांमुळे हे शहर इथल्या नागरिकांना एक सुंदर आयुष्य जगण्याची संधी देते.

**युकेआयबीसीबद्दल:** द युके इंडिया बिझनेस कौन्सिल (युकेआयबीसी) ही भारत आणि युके या दोन देशांमधील व्यापार आणि गुंतवणूकीला प्राधान्य देणारी व्यावसायिक संस्था आहे. व्यावसायिक संवादाच्या माध्यमातून युके आणि भारत या दोन देशांमधील व्यापार वृद्धिंगत करणे, हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. ज्यात मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीची भरभराट होते असे वातावरण निर्माण करण्यात आणि टिकवून ठेवण्यात युकेआयबीसी प्रभावी भूमिका बजावते. भागीदार्यांसाठी सुयोग्य सुविधा आणि प्रभावी कंपन्या आणि व्यक्तिगत सदस्यांच्या नेटवर्कच्या माध्यमातून यूकेआयबीसी इंग्लंडमधील कंपन्यांना भारतातल्या उदयमान संधींचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा यासाठी आवश्यक संसाधनं, ज्ञान आणि पायाभूत पाठबळ मिळवून देते. अधिक माहितीसाठी www.UKIBC.com वर संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी संपर्क -
ऍडफॅक्टर्स पीआर
श्री. परीक्षित जोशी - 9833917030
parikshit.joshi@adfactorspr.com
श्री. निनाद सिद्धये - 9619500760
ninad.siddhaye@adfactorspr.com
लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड
श्री. अश्विन शेट्टी- 9967024293
ashwin.shetty@lavasa.com
श्री. अंकुल भावसार - 9820168842
ankul.bhavsar@lavasa.com